**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९
दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७२ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/31 /२०२२
दिनांक : - 2 APR 2022

प्रति,
मे.---------------------------------------------------
---------------------------------------------------
---------------------------------------------------

विषयः- खोबरेवाटी, चिंच, आमसुल, मगज बी व भाजके पोहे दरपत्रक मागणी...

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबत परिशिष्टात नमूद तपशीलाप्रमाणे खोबरेवाटी, चिंच, आमसुल, मगज बी व भाजके पोहे खरेदी दरपत्रक पध्दतीने खालील अटी-शर्तीस अनुसरून करावयाची आहे. त्यास अनुसरून आपण आपले दर सोबतचे परिशिष्टात भरून परिशिष्ट आपले लेटरहेडवरील कव्हरींग पत्रासह सादर करावे.

अटी/शर्ती –

१. सोबतचे परिशिष्ठामध्ये आपले दर भरून आपल्या दुकानाचे कव्हरींग पत्रासह दयावयाचे आहेत. आपले दर **सर्व कर, GST-TDS, हमाली, वाराई शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानचे भांडार विभागात पोहचचे वाहतूक खर्चासह प्रती क्विंटलचे दर सादर करावेत.**
२. दरपत्रकासोबत GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt, FSSAI लायसन्स व पॅन कार्डची झेरॉक्स प्रत जोडावी.
३. शिर्डी साईबाबा संस्थान हे धर्मदाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.
४. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अगर सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहाणार नाही.
५. सिलबंद पाकिटातील दरपत्रक संस्थानचे आवक विभागामध्ये विहित मुदतीत जमा करावेत. पाकिटावर **"खोबरेवाटी, चिंच, आमसुल, मगज बी व भाजके पोहे खरेदी दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
६. माल पुरविलेनंतर साधारण ३० दिवसांचे आत बील आदा करण्याचा श्री साईबाबा संस्थानचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी श्री साईबाबा संस्थानकडून आगाऊ रक्कम (ॲडव्हान्स) दिली जाणार नाही.
७. श्री साईबाबा संस्थानकडून पुरवठा आदेश दिलेनंतर ३-४ दिवसांत सदर मालाचा पुरवठा करावा लागेल.
८. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहिल.
९. दरपत्रक सादर करण्याची अंतीम दिनांक ८ / ४ /२०२२.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
## खरेदी विभाग
## दरपत्रक परिशिष्ट

| अ.नं | मालाचा तपशिल | मागणी क्विंटल | दर प्रती क्विंटल GST व सर्व समावेशक खर्चासह | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | खोबरेवाटी- राजापुरी- काळीपाठ- वाळलेली | २० | | |
| २ | चिंच-फोडलेली व स्वच्छ, बिगर चिचोकेची | २ | | |
| ३ | आमसुल- ओलसर, चांगल्या प्रतीचे | २ | | |
| ४ | मगज बी-चांगल्या प्रतीचे | ०.२० | | |
| ५ | भाजके पोहे-चांगल्या प्रतीचे | ६ | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का